Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)


ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL



# AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi / Hindi Part - II



IMPACT FACTOR /
INDEXING 2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | गतिशिल प्रशिक्षणाचा बॉक्सींग खेळाडूच्या ताकद, गति, व चपळतेवर होणाऱ्या परिणामाचे अध्ययन<br>**महेश दगडू पंडागळे**<br>**प्रा. डॉ. संजय जगन्नाथ चंद्रशेखर** | ५९-७० |
| १४ | संगीतातील भक्तीरस व निर्गुणगीत<br>**प्रा. डॉ. गहिनीनाथ वळेकर** | ७१-७३ |
| १५ | भारतीय संघराज्यात नवीन राज्य निर्मितीची समस्या<br>**डॉ. श्याम कदम** | ७४-७५ |
| १६ | युरोपियन सत्तांचे भारतात आगमन : एक आढावा<br>**डॉ. सचिन उत्तमराव हंचाटे** | ७६-८४ |
| १७ | १९ व्या शतकातील स्त्रीवर्गाचे स्थान आणि स्त्री शिक्षण<br>**डॉ. रावसाहेब भिमराव नेरकर** | ८५-८८ |
| १८ | कविता-कथा-कादंबरी आणि नाटक यांचा तौलनिक अभ्यास<br>**ऋषिकेश कांवळे** | ८९-९२ |
| १९ | जातककालीन भारताची भौगोलिक आणि आर्थिक व्यवस्था<br>**प्रा. राजेश उत्तमराव शेगांवकर** | ९३-९५ |
| २० | ग्रंथालय शास्त्र : पाच सुत्र<br>**धोंगडे रवि देवराव** | ९६-१०१ |





Scanned with OKEN Scanner

18-19

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

IQAC PAROLA Rani Laxmibai Mahavidyalaya Dist. Jalgaon

# १७. १९ व्या शतकातील स्त्रीवर्गाचे स्थान आणि स्त्री शिक्षण

**डॉ. रावसाहेब भिमराव नेरकर**
इतिहास विभाग, राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय, पारोळा, जि. जळगांव.

**प्रस्तावना**

कुटुंबसंस्था हे समाजाचे मुलभूत अंग आहे. समाजव्यवस्था सुसंघटीत आणि सुव्यवस्थित राहण्यासाठी कुटुंबसंस्था महत्वपूर्ण कार्य करते. मानवी समाजात मुलांचा जन्म, वृद्धी आणि संगोपन हे कुटुंबसंस्थेतच होत असते. १९व्या शतकात मातृसत्ताक कुटुंबसंस्थेकडून पितृसत्ताक अवस्थेत समाज आला आणि उत्पादन साधने, मालमत्ता, सत्ता यावर पुरुषवर्गाची मक्तेदारी निर्माण झाली. यातुनच स्त्रीवर्गाच्या शोषणाला सुरुवात झाली. कुटुंबव्यवस्थेतील कणा असलेल्या स्त्रीला दुय्यम लेखले गेल. स्त्रीचे जीवन अनेक रुढी परंपरा, बंधनांनी जखडले गेल.

'विवाह हा आर्यसंस्कृतीत अतिशय पवित्र संस्कार मानला जातो. 'विवाह या संकल्पनेत 'वि+वाह' वि म्हणजे दुसरा, वाह म्हणजे वाहून नेणे, एकाने दुस-याला आयुष्यभर गुणदोषांसह वाहून नेणे, स्वीकारणे ही उदात्त कल्पना या पाठीमागे आहे'.[१] म्हणजेच स्त्री-पुरुष यांच्या सहजीवनातून एक निर्मळ पवित्र समाजजीवन निर्माण व्हावे अशी अपेक्षा आहे. परंतू प्रत्यक्षात १९व्या शतकात या विवाहसंस्थेचे उदात्त तत्व बाजूलाच राहीले होते. स्त्रीकडे एक उपभोग्य वस्तु म्हणुन बघितले जात होते. अतिशय वाईट अशा प्रथापरंपरेत तिला गुरफटुन तिचे जीवन बंदीस्त केले होते. या पार्श्वभूमीवर खानदेशात श्रीधरशास्त्री पाठकांसारख्या थोर विचारवंतांनी समाज उद्बोधनास सुरुवार केली. 'संस्कारयुक्त विवाहसंस्था ही मानवाच्या सुसंस्कृतपणाचे निरर्थक असून त्यामुळे शुद्ध व वात्सल्ययुक्त अंतःकरणाने व कर्तृत्वबुद्धीने बालक व स्त्री यांची भरण पोषण व्यवस्था आपोआप झाली व मानवी मनोविकासाचे पाऊल त्यायोगे पुढे सरकले'.[२] आपल्या संस्कृतीतील नैतिकता, सद्विचार आणि सुसंस्कार हे गुण विवाहसंस्थेच्या माध्यमातून निर्माण झालेले आहेत. तसेच विवाहसंस्थेतून स्त्रीच्या पालनपोषणाची जबाबदारी पुरुषसत्ताक कुटुंबपद्धतीची आहे. या तत्वांचा, विचारांचा १९व्या शतकाच्या उत्तरार्धात समाजाला विसर पडलेला दिसतो.

**बालविवाह पद्धती**

१९व्या शतकात आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मुलींच्या लग्नाचे वय कय असावे याला बंधन नव्हते. अगदी बालवयातच मुलींला विवाह म्हणजे काय, संसार काय हे कळत नसतांना अवघ्या ५ ते ६ वर्षे वयाची असतांना तिचा विवाह केला जात असे. या विवाहामध्ये वराच्या वयाची मर्यादा मात्र नसे. साठ ते पासष्ठ वयाच्या वराशीही या कोवळ्या मुलीचा विवाह केला जाई. लग्नानंतर काही दिवसांतच मुली विधवा होत असत. 'हळदीच्या डागावर विधवा झालेया त्या मुलींला सारं आयुष्य परित्यक्त्या म्हणून व्यतीत करावे लागे'.[३] अतिशय दयनीय स्थितीत विधवा स्त्रियांना आपलं जीवन कंठावे लागत असे. 'खानदेशात स्त्रियांची चळवळ ख-या अर्थाने धुळयात महिला सभेच्या स्थापनेनंतर सुरु झाली श्रीमती विजया चौक यांनी या



Self Attested